नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४ Issue - 4 | वार - शुक्रवार दि. २९ मे २०२६ Blow- Friday Date 29 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## दापोडी-फुगेवाडीत एकाच दिवशी आठ जणांचा संशयास्पद मृत्यू

### पिंपरी-चिंचवड हादरले! विषारी दारूचा नागरिकांचा आरोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी आणि फुगेवाडी परिसरात गुरुवारी एकाच दिवशी आठ नागरिकांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आल्याने संपूर्ण परिसरात घबराट आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, याच परिसरातील रहिवासी असलेल्या आणखी दोघांवर वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार सुरू असून, दोघांचीही प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. बंदी असलेली हातभट्टीची गावठी ( विषारी ) दारू प्यायल्यानेच या नागरिकांचा बळी गेल्याचा गंभीर आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. या प्रकरणावरून आता राजकीय वातावरणही तापले असून, अशा अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

परिसरात अवैध हातभट्टीची दारू सर्रास विकली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अशा घटनांकडे दुर्लक्ष करणारे पिंपरी-चिंचवड पोलीस कधी जागे होणार ? असा संतप्त सवाल उपस्थित करत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी महापौर योगेश बहल यांनी या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणीही त्यांनी लावून धरली आहे. स्थानिक आणि लोकप्रतिनिधींकडून विषारी दारूचा उघड आरोप केला जात असताना, पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मात्र वेगळा दावा केला आहे. ८ पैकी ५ नागरिकांचा मृत्यू वेगवेगळ्या कारणांनी झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र, आश्चर्याची बाब म्हणजे मृत पावलेल्या ८ पैकी ५ व्यक्तींना मृत्यूपूर्वी तीव्र चक्कर आली होती, अशी माहिती खुद्द पोलिसांनीच दिली आहे. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. उर्वरित मृत नागरिक आणि सध्या उपचार सुरू असलेल्या व्यक्तींची प्रकृती नेमकी दारू प्यायल्याने बिघडली होती का ? याचा तपास सध्या सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. एकाच दिवसात मृत पावलेले सर्व नागरिक एकाच परिसरातील रहिवासी आहेत. त्यामुळे त्यांचा मृत्यू विषारी दारू प्यायल्याने झाला, की पोलीस म्हणत असल्याप्रमाणे अन्य कोणत्या आजाराने किंवा कारणाने झाला ? हे अद्याप अधिकृत वैद्यकीय अहवालाअंती स्पष्ट झालेले नाही. या संभ्रमामुळे फुगेवाडी परिसरातील नागरिकांची चिंता कमालीची वाढली आहे.

घटनेतील मृतांची नावे

१) पांडुरंग फुगे २) विजय प्रकाश राठोड ३) राजेंद्र प्रकाश राठोड ४) राजू राजपूत ५) अकबर पठाण ६) बाबा शेख ७) आनंद देसाई ८) आनंद निकाळजे

रुग्णालयात मृत्यूशी झुंज देणारे नागरिक:

१) सुभाष डिगीकर (उपचार सुरू: मेडी पॉईंट हॉस्पिटल) २) अक्षय अवसरमल (उपचार सुरू: यशवंतराव चव्हाण रुग्णालय) दोघांचीही प्रकृती डॉक्टरांच्या मते अत्यंत चिंताजनक आहे.

## १०० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार; अनेक राज्यांना मोठा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरात वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये कडाक्याचं ऊन पडत आहे. पण आता वातारणात मोठे बदल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. देशातील काही राज्यांमध्ये पुढच्या काही तासांत ११० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार आहेत. यासोबत मुसळधार पावसाचादेखील अंदाज वर्तवण्यात आला आहे. नैऋत्यू मान्सून वेगाने आगेकूच करत आहे.



या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली आणि हरियाणा इथे २९ मे च्या दिवशी हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. इथे ८० ते १०० किमी प्रतितास विगाने वादळ येण्याची शक्यता आहे. तसेच ३० मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तर प्रदेशमध्येदेखील अशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात उद्या २९ मे रोजी ६० ते ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. इथे २८ आणि २९ तारखेला गारपीटची शक्यता आहे. तसेच २९ मे रोजी पश्चिम यूपीत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

बिहारमध्ये २८ आणि २९ हे दोन दिवस अतिमुसळधार पावसाचे असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. झारखंडला २८ मे ते १ जून या काळात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय धुळीचे वादळ देखील येण्याची शक्यता आहे.

पश्चिम बंगालमध्ये २८ आणि २९ मे रोजी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या इथे ५० ते ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तराखंडसह जम्मू आणि काश्मीरमध्ये वादळ येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. मध्य प्रदेळातही वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात ३० मे पर्यंत मुसळधार पावसाचा आणि गारपीटचा अंदाज वर्तवण्यात आल आहे. छत्तीगड राज्यात २९ आणि ३० मे या दोन दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या तरी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## राज्यभर अन्न व औषध प्रशासनाच्या धडक मोहिमेत ३३ आरोपींना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (ऋऊ) मोठी धडक कारवाई सुरू केली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर विशेष मोहीम राबवण्यात आली असून, आतापर्यंत ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच २७ आस्थापनांवर सील ठोकत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर थेट कारवाई**

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, कोकण आणि छत्रपती संभाजीनगर विभागांमध्ये ही विशेष मोहीम राबवण्यात आली. बनावट, भेसळयुक्त आणि अस्वच्छ पद्धतीने तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांवर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी विविध भागांत अचानक छापे टाकून प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू, बनावट दूध, अस्वच्छ वातावरणात तयार होणारे पदार्थ आणि निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ जप्त केले. या मोहिमेत गुटखा, पानमसाला आणि तंबाखू प्रतिबंधक कायद्यांतर्गत अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

२० लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त :

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईदरम्यान सुमारे २० लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३४ प्रकरणांमध्ये तपास सुरू असून, ११ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

धरणगावमध्ये गायीच्या दुधात रसायन मिसळून कृत्रिम दूध तयार केले जात असल्याचे उघड झाले. संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.


- पुण्यात कार्बाईड रसायनांचा वापर करून कृत्रिमरीत्या पिकवलेले आंबे जप्त करण्यात आले. जवळपास २ लाख रुपयांचे आंबे नष्ट करण्यात आले.

- धुळे जिल्ह्यात अस्वच्छ वातावरणात मटर बेसन तयार करणाऱ्या कारखान्यावर कारवाई करत सुमारे २.४४ लाखांचा साठा जप्त करण्यात आला.

- मुंबईतील धारावी परिसरात नियमांचे उल्लंघन करून गुळाचे उत्पादन करणाऱ्या आस्थापनावर छापा टाकण्यात आला. मोठ्या प्रमाणात साठा जप्त करण्यात आला आहे.

- नाशिकमध्ये परवानगी नसताना खाद्यपदार्थ उत्पादन, बनावट लेबलिंग आणि निकृष्ट दर्जाचे तेल विक्री करणाऱ्या अनेक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.

- पालघरमध्ये अस्वच्छ वातावरणात आईस्क्रीम उत्पादन सुरू असल्याचे



आढळून आले. लाखो रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात कठोर गुन्हे दाखल करू - तुकाराम मुंढे

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट इशारा देत म्हटले की, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कठोर कारवाई केली जाईल. राज्यभर ही मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सावरकरांच्या प्रतिमा वापरून फक्त धर्मात तेढ पसरवणे सुरू : राज ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे प्रखर हिंदू धर्मभिमानी असले तरी त्यांनी धर्मातील त्रुटींवर बोट ठेवायला कधीही मागेपुढे पाहिले नाही. मात्र, दुर्दैवाने आज त्याच सावरकरांच्या महाराष्ट्रात त्यांच्या प्रतिमांचा वापर करून केवळ आणि केवळ धर्मात तेढ पसरवण्याचे घाणेरडे राजकारण सुरू आहे, असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी व्यक्त केले. 'सावरकरांच्या टीकाकारांना ते कधी कळलेच नाहीत, पण त्यांचा उदोउदो करून मतांची बेगमी करणाऱ्यांना तरी सावरकर समजलेत का?' असा सवाल करत त्यांनी सत्ताधारी आणि विरोधक दोघांनाही खडे बोल सुनावले.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर सविस्तर पोस्ट लिहून महाराष्ट्राच्या सद्य राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, सावरकर हे केवळ हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्त्वज्ञ नव्हते, तर ते क्रियाशील धर्मसुधारक, समाजसुधारक आणि अत्यंत विज्ञाननिष्ठ महापुरुष होते. मात्र, ज्या भूमीत सावरकर जन्माला आले, तिथे आज 'व्हॉट्सप विद्यापीठा'त येणारे खोटे संदेश सत्य-असत्य न तपासता खरे मानण्याची चढाओढ लागली आहे. याच महाराष्ट्रात आजचे राजकारणी भोंदू बाबांच्या भजनी लागले आहेत, तर तरुण पिढीला उत्सव आणि डीजेच्या तालावर गुंतवून ठेवले जात आहे. जिथे सावरकरांनी जाती अंताचा लढा दिला, त्याच महाराष्ट्रात आज जातींवरून डोकी फोडण्याचे प्रकार सुरू आहेत आणि दुर्दैवाने याला सत्ताधारीच खतपाणी घालत आहेत, अशी टीका त्यांनी केली. उठता-बसता सावरकरांचा तिरस्कार करणाऱ्यांना बाजूला ठेवा, पण जे त्यांचा वापर स्वतःच्या राजकारणासाठी करत आहेत, त्यांना नक्की कुठले सावरकर कळलेत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आपण कोण होतो, आपली महाराष्ट्राची परंपरा किती उज्ज्वल होती, हेच जर आपण विसरलो, तर पुढे जाण्याचा मार्ग कसा आखणार?

### दिल्लीत उच्चस्तरीय बैठक; सुरक्षेवर सखोल चर्चा

### विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवण्याचे मोठे आव्हान

## नीट फेरपरीक्षेसाठी सरकारचा मास्टरप्लॅन! पेपर सुरक्षेसाठी आता थेट वायूदलाची एन्ट्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांमुळे देशभरात निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे क्शन मोडमध्ये आले आहे. २१ जून रोजी होणारी छएएढ फेरपरीक्षा कोणत्याही गैरप्रकाराशिवाय आणि अत्यंत सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी सरकारने थेट भारतीय लष्कर आणि वायूदलाची मदत घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशातील विविध परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका सुरक्षित आणि गुप्त पद्धतीने पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाच्या विशेष विमानांचा वापर करण्यात येणार आहे. तर परीक्षा प्रक्रियेत सुरक्षेची कडक अंमलबजावणी करण्यासाठी लष्कराची मदत घेतली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवारी दिल्लीमध्ये अत्यंत महत्त्वाची उच्चस्तरीय बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत २१ जूनच्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण नियोजनासह सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रश्नपत्रिका छपाईपासून ते परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रत्येक टप्प्यावर विशेष देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

परीक्षा 'फुलप्रूफ' करण्यासाठी कठोर उपाय :



नीट परीक्षेतील वाढत्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास डळमळीत झाला होता. त्यामुळे यावेळी परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे 'फुलप्रूफ' करण्यासाठी सरकारने कठोर उपाययोजना आखल्या आहेत.

संवेदनशील परीक्षा केंद्रांवर अतिरिक्त सुरक्षा तैनात केली जाणार असून, सीसीटीव्ही मॉनिटरिंग, डिजिटल ट्रॅकिंग आणि बहुस्तरीय सुरक्षा तपासणी केली जाईल. प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीदरम्यान कोणतीही माहिती बाहेर जाऊ नये यासाठी विशेष तांत्रिक यंत्रणाही वापरण्यात येणार आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातून केंद्र सरकार आणि एनटीएवर जोरदार टीका झाली होती. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याच्या आरोपांनंतर आता केंद्र सरकार स्वतः या प्रकरणात गंभीरपणे लक्ष घालत असल्याचे दिसून येत आहे. लष्कर आणि वायूदलाच्या थेट सहभागामुळे प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता, परीक्षा केंद्रांवरील नियंत्रण आणि संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता वाढणार असल्याचा दावा सरकारकडून केला जात आहे.

सीबीआयचा तपास वेगात; आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी :

दरम्यान, नीटपेपरफुटीप्रकरणातील तपासही वेगाने सुरू आहे. मुख्य संशयित आरोपी शिवराज मोटेगांवकर आणि त्याच्या कुटुंबीयांशी संबंधित बँक खाती आणि लॉकर्सची तपासणी आता सीबीआयकडून करण्यात येत आहे. सीबीआयच्या पथकाकडून मोठ्या प्रमाणातील आर्थिक व्यवहार, रोख रक्कम, डिजिटल पुरावे आणि मालमत्तेशी संबंधित कागदपत्रांचा शोध घेतला जात आहे. या आंतरराज्यीय पेपर लीक रॅकेटमधील पैशांच्या व्यवहारांबाबत महत्त्वाचे पुरावे हाती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### उपाययोजना

नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांमुळे देशभरात निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे क्शन मोडमध्ये आले आहे. २१ जून रोजी होणारी छएएढ फेरपरीक्षा कोणत्याही गैरप्रकाराशिवाय आणि अत्यंत सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी सरकारने थेट भारतीय लष्कर आणि वायूदलाची मदत घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशातील विविध परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका सुरक्षित आणि गुप्त पद्धतीने पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाच्या विशेष विमानांचा वापर करण्यात येणार आहे. तर परीक्षा प्रक्रियेत सुरक्षेची कडक अंमलबजावणी करण्यासाठी लष्कराची मदत घेतली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी दिल्लीमध्ये अत्यंत महत्त्वाची उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीत २१ जूनच्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण नियोजनासह सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रश्नपत्रिका छपाईपासून ते परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रत्येक टप्प्यावर विशेष देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नीट परीक्षेतील वाढत्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास डळमळीत झाला होता. त्यामुळे यावेळी परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे 'फुलप्रूफ' करण्यासाठी सरकारने कठोर उपाययोजना आखल्या आहेत. संवेदनशील परीक्षा केंद्रांवर अतिरिक्त सुरक्षा तैनात केली जाणार असून, सीसीटीव्ही मॉनिटरिंग, डिजिटल ट्रॅकिंग आणि बहुस्तरीय सुरक्षा तपासणी केली जाईल. प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीदरम्यान कोणतीही माहिती बाहेर जाऊ नये यासाठी विशेष तांत्रिक यंत्रणाही वापरण्यात येणार आहे. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातून केंद्र सरकार आणि एनटीएवर जोरदार टीका झाली होती. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याच्या आरोपांनंतर आता केंद्र सरकार स्वतः या प्रकरणात गंभीरपणे लक्ष घालत असल्याचे दिसून येत आहे. लष्कर आणि वायूदलाच्या थेट सहभागामुळे प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता, परीक्षा केंद्रांवरील नियंत्रण आणि संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता वाढणार असल्याचा दावा सरकारकडून केला जात आहे.

# मंडळी आपण जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगूया: दुसऱ्यांचं सोडा हो...

# आपल्या स्वत:च्याच जन्मदात्या आईवडिलांची तरी म्हातारपणात काळजी घेऊया.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मी हे जे काही लिखाण करत आहे ते माझ्या दररोजच्या प्रवासात आणि आपल्या अवतीभवती अनुभवास आलेल्या प्रसंगावर लिहित आहे. वैयक्तिक कोणाला उद्देशून माझे हे लिखाण नाही. माझी एवढीच भावना आहे की, सर्वच बंधू-भगिनींनी आपल्या आई-वडिलांच्या उतार वयात त्यांची मनापासून काळजी घ्यावी. या उद्देशातून मी हे लिहिलं आहे. जे आपल्या आई वडिलांची मनापासून काळजी घेतात त्या सर्वांना माझा मानाचा मुजरा...

मंडळी आपल्या पूर्वजांनी अनेक सुसंस्काराचे बीज रुजवलेल्या महाराष्ट्राच्या पुण्यभूमीमध्ये आपण जन्माला आलेलो आहोत. पण सध्याच्या काळामध्ये आपण अनेक जण संस्कार हीन बनत चाललेलो आहोत.ही खूप दुर्दैवी गोष्ट आहे. आपल्या मातापित्याने पाहिलेल्या स्वराज्य निर्मितीच्या स्वप्नाला छत्रपती शिवरायांनी आपल्या अखंड परिश्रमातून साकार केलं, आपल्या पित्याने निर्माण केलेल्या स्वराज्याचं शंभूराजांनी प्राणपणाने रक्षण केले. आपल्या अनेक समाज सुधारकांनी जात, धर्मपंथापलीकडे जाऊन समाजाची सेवा केली. स्वर्गीय श्री. बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांची, आदिवासींची जीवनभर सुषृषेसह सेवा केली. आपल्या स्वर्गीय श्री.सिंधुताई सपकाळ यांनी अनेक निराधार अनौरस बालकांना आधार देऊन त्यांच्या जीवनाला आकार दिला. इतकच नव्हे तर त्यांना उत्तम शिक्षण देऊन संस्कारक्षम बनवले. यासह अनेकांनी आपलं जगणं दुसऱ्यांच्या कल्याणासाठी वाहिल आणि आज देखील अनेक जण लोककल्याणास्तव झटत आहेत. ही सारी मंडळी जगाच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित करती झाली आणि आपण आपल्या जन्मदात्या आई-वडिलांना आणि तेही त्यांच्या पडत्या काळात त्यांना आधार हीन बनवतोय ही कुठली नीतिमत्ता. अरे जनावरांना देखील संवेदना आणि सहवेदना असतात. मग आपण तर सर्व गोष्टींची समज आणि जाण असणारी जीती जागती माणस आहोत. माणूस म्हणून आपण आपल्याच माणसांशि एवढे असंवेदनशील वागत असू तर आपल्यापेक्षा जनावरे बरी ना.

मंडळी सद्यस्थितीमध्ये आपल्या अवतीभोवतीच्या परिसरामध्ये खूप ठिकाणी अतिशय वेदनादायी दृश्य दृष्टीस पडत आहेत. आपल्याला जन्माला घालत असताना आपल्या आईने असंख्य वेदना सहन केल्या, आपण बाहेरगावी शिकायला असताना पहाटे उठून आपणास डबा बनवून दिला आणि आपल्या वडिलांनी आपल्याला वाढवत असताना अनेक मान अपमान सहन केले, पर्वता एवढे कष्ट उपसले, आपल्याला नोकरी लागावी म्हणून आपला वडील अनेकांचे दरवाजे झिजवत होता, आपले प्रत्येक हट्ट आपल्या मातापित्याने पुरवले. पण जेव्हा ते नियत वयोमानानुसार वृद्धत्वाच्या मार्गावर वाटचाल करू लागले, तेव्हा आपण त्यांना अपमानित करतोय, कुत्र्या मांजरांचा लाड पुरवणारे आपण जन्म दात्या माता-पित्यांना एक वेळचे जेवण देखील देऊ शकत नाही.खरंच ही खूपच भयावय परिस्थिती आहे. आपल्या स्वतःच्याच माता-पित्यांना त्यांच्या उतार वयात त्यांना आपण शारीरिक, मानसिक छळत आहोत, त्यांना शिव्या देणे, त्यांचा वेळोवेळी चार चौघात अपमान करणे, त्यांना घालून पाडून बोलणे, इतके कमी की काय काही ठिकाणी तर स्वतःच्या जन्मदात्या माता-पित्यांना मारण्यापर्यंत देखील आपली मजल गेलेली आहे. ज्या वृद्ध माता पित्याने विश्वासाने आपली सारी संपत्ती आपल्या मुलांच्या नावाने केलेली आहे, अशा माता-पित्यांची तर परिस्थिती खूपच भयानक आहे. अशा मातापित्यांना सरळ सरळ त्यांच्या हक्काच्या घरामधून बेघर करण्यात येत आहे.अशा दुर्दैवी वृद्धांच्या डोळ्यांच्या कडा या अश्रू वाहून वाहून जड झाले आहेत.

असं म्हणतात की, मातापित्यांसोबत बरे वाईट पणे वागण्यांचे संस्कार हे कळत नकळत आपल्या मुलांवर होत असतात. मग आपण आपल्या मुलांना कोणता संस्कार देतोय ? बंधू-भगिनींनो किती दिवस या जगामध्ये आपला मुक्काम आहे हे आपणा कोणालाच माहीत नाही.या शाश्वत जगामध्ये आपले अशाश्वत अस्तित्व आहे. मग मंडळी आपण आपलं या जगामध्ये अस्तित्व असलेल्या काळामध्ये संस्काररूपी जीवन जगून या पृथ्वीच्या सौंदर्यामध्ये थोडा तरी भर घालूया ना. अरे आपल्याच ईश्वर रुपी मातापित्यांना जेव्हा ते निराधार झाले अशा उतार वयात त्यांना का आपण छळतोय??? अरे लाख केले असतील आपले माता पिता चुका, केले असतील आपल्या दोन भावांमध्ये दोन दुसरे. म्हणून काय झालं?? ते आपलेच माता-पिता आहेत ना? त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्यांना थोडं द्या ना मान सन्मान, आपल्या वागण्याने त्यांच्या डोळ्यात अश्रूतरळणार नाहीत याची घ्या ना काळजी. काही काही ठिकाणी तर आई-वडिलांची भावा-भावामध्ये वाटणी केलेले असते.अरे नालायक वृत्तीच्या नराधामांनो जीवनभर ते पती-पत्नी म्हणून एकत्र राहिले अशा माता पित्याची वाटणी करणारे आपण कोण?? ज्यांच्याकडे आपल्या आई-वडिलांना राहावं वाटतं त्या भावाकडे ते खुशाल राहू दे ना. आपण जरी भाऊ भाऊ वेगवेगळे राहत असतो तरी ज्या भावाजवळ आपले आई वडील आहेत त्या भावासह आपल्या आई वडिलांसोबत राहू या ना प्रेमाने. आई वडिलांच्या दुखण्या खुपण्यात त्यांच्या आजारपणात खंबीर पणे उभे राहू या ना.. आपल्या वृद्ध माता-पित्यांना आपल्या हातून काहीच द्यायचं झालं नाही तर निदान त्यांचं मन तरी दुखावणार नाही याची तरी काळजी घेऊया.. जे आई-वडील स्वतः उपाशी राहून आपल्याला जगवले अशा आपल्याच आई-वडिलांची त्यांच्या उतार वयामध्ये आपण जे खातोय त्या ताटातील चतकोर तरी त्यांना देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची संधी देऊया ना. आई-वडिलांच्या वर्षश्राद्धाला हजारोंची पंगती उठवण्यापेक्षा ते जोपर्यंत जिवंत आहेत तोपर्यंत त्यांची काळजी घेऊ या ना.. ते कृतार्थपणे आपणास आशीर्वाद देऊन या जगाचा निरोप घेतील.

मंडळी विषय खूप महत्त्वाचा आहे. यावरती कितीही लिहिलं तरी कमीच आहे. या लिखाणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा आपणा सर्वांना माझी एवढीच कळकळीची नम्र विनंती आहे की, आपण सारे जण सह वेदना जागृत ठेवून संवेदन पणे जीवन जगूया. आपल्या अवतीभोवतीच्या निराधारांना आपणास जमेल त्या मार्गाने आधार देऊया...

**– शब्दांकन.**
**श्री. मारुती देविदास शिंदे.**
**वागदरी..**

# मत्स्यव्यवसाय विभागाने आर्थिक काटकसर करावी : मंत्री नितेश राणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मत्स्यव्यवसाय विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि आर्थिक शिस्त यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. शासनाचा निधी हा जनतेचा पैसा असून त्याचा विनियोग नियमबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने होणे आवश्यक आहे. विभागातील सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी आर्थिक व्यवहारांमध्ये काटेकोर शिस्त पाळून विकासकामांना गती द्यावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले

मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत महत्त्वाच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह विभागाचे विविध अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे यांनी सांगितले की, ''मासेमारी बंदीचा काळ हा मच्छीमार बांधवांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण असतो. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, क्रियाशील मच्छीमारांना थेट दिलासा मिळावा, यासाठी ही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील मच्छीमारांचे आर्थिक सक्षमीकरण हेच शासनाचे प्राधान्य आहे.'' राज्य शासनाच्या या निर्णयामुळे किनारपट्टी भागातील हजारो मच्छीमार कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, बंदीच्या कालावधीत त्यांचा उदरनिर्वाह सुलभ होण्यास मदत होणार आहे.

**पावसाळी मासेमारी बंदी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याबाबत सरकार सकारात्मक**

राज्यातील मत्स्यसाठ्यांचे संवर्धन, मच्छीमारांचे जीवित व आर्थिक संरक्षण; तसेच समुद्रातील वाढत्या वादळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पावसाळी मासेमारी बंदी कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याबाबत शासनस्तरावर गंभीरपणे विचार सुरू आहे.

सध्या महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत दरवर्षी १ जून ते ३१ जुलै या कालावधीत यांत्रिक व यंत्रचलित नौकांना मासेमारी बंदी लागू असते. मात्र गेल्या काही वर्षापासून समुद्रातील वादळी वातावरण, चक्रीवादळे व प्रतिकूल हवामानामुळे १ ऑगस्टनंतरही मासेमारीसाठी समुद्रात जाणे शक्य होत नसल्याने; तसेच या कालावधीत मत्स्य प्रजननास वाव असल्याने बंदी कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याची मागणी मच्छीमार संघटनांकडून करण्यात आली आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

**'मत्स्य पाव' मोबाईल फूड व्हॅन योजना**

राज्यातील मच्छीमारांना मूल्यवर्धनातून अधिक उत्पन्न मिळावे आणि शहरी भागात स्वच्छ व पौष्टिक समुद्री खाद्य उपलब्ध व्हावे यासाठी 'मत्स्य पाव मोबाईल फूड व्हॅन' योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत 'फिश पाव', 'मत्स्य वडापाव' आणि इतर मत्स्यजन्य पदार्थांची विक्री केली जाणार आहे. एका प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे १२.५० लाख रुपये असून युवक, महिला बचत गट आणि मत्स्य उत्पादक संस्थांना रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होणार आहे.

**ब्लू इकॉनॉमीसाठी ७३५ कोटींचा महत्त्वाकांक्षी आराखडा**

राज्यात 'ब्लू इकॉनॉमी'ला चालना देण्यासाठी सागरी संवर्धन आणि डीप सी ट्युना फिशिंग प्रकल्प राबविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. निवृत्त आयएएस अधिकारी सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सागरी संवर्धनासाठी ६०० कोटी रुपये तर डीप सी ट्यूना फिशिंगसाठी १३५ कोटी रुपये असा एकूण ७३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे मत्स्योत्पादन वाढ, निर्यात वृद्धी, रोजगारनिर्मिती आणि मच्छीमारांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**अंबरग्रीस संदर्भात स्वतंत्र धोरणाची तयारी**

समुद्री जैवविविधता आणि किनारी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या अंबरग्रीस विषयावरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. वन विभाग, कोस्ट गार्ड, वाईल्डलाईफ क्राईम कंट्रोल ब्यूरो आणि मत्स्य विभाग यांच्या समन्वयातून संयुक्त कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. किनारी भागातील मच्छीमारांना जागरूक करून 'मरिन फिशरमेन वेलफेअर रेसिलंस फंड' स्थापन करण्याचाही प्रस्ताव मांडण्यात यावेळी आला.

**मच्छीमार महिलांसाठी हॅण्डग्लोज व गमबूट योजना**

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मच्छीमार महिलांना हॅण्डग्लोज, गमबूट आणि संरक्षण साहित्य उपलब्ध करून देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. मुंबईतील मासळी बाजारांमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि प्रक्रिया कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी आयसीएआर-सीआयएफटी मार्फत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून ५०० महिला कामगारांना संरक्षण साहित्य वितरित केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३०.६९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

**मरोळ येथे १३८ कोटींचा अत्याधुनिक मासळी बाजार**

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मुंबईतील मरोळ येथे अत्याधुनिक मासळी बाजार उभारण्याच्या १३८ कोटी रुपयांच्या प्रकल्पालाही गती देण्यात आली आहे. या प्रकल्पात कोल्ड स्टोरेज, ड्राय फिश मार्केट, मत्स्यालय, प्रशिक्षण केंद्र, पार्किंग सुविधा आणि कोळी भवनाचा समावेश असेल. केंद्र सरकारकडून ३० कोटी, राज्य सरकारकडून २० कोटी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ८८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

### महाराष्ट्रात इंधनाच्या मागणीमध्ये झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर,

# सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी इंधनाच्या अखंडित पुरवठ्याची दिली खात्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पश्चिम आशियात सध्या सुरु असलेल्या भूराजकीय तणावाच्या परिस्थितीने जागतिक पुरवठा साखळ्यांना प्रभावित केलेले असताना, तेल उद्योगांचे (महाराष्ट्र) राज्यस्तरीय समन्वयक मिहीर गणेश जोशी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील (पीएसयु) (बीपीसीएल, आयओसीएल आणि एचपीसीएल यांसारख्या) तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसीज) ग्राहकांना महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेल तसेच एलपीजी यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे अशी ग्वाही दिली आहे. पुरवठ्याच्या कार्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून कोणत्याही अडथळ्यांविना या इंधनांचा पुरवठा करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील विविध पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्याची स्थिती

**पेट्रोल आणि डिझेल**

महाराष्ट्रातील सर्व पेट्रोल पंपांवर तसेच तेल कंपन्यांच्या साठवणीच्या ठिकाणी पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे याची ग्वाही पीएसयु तेल विपणन कंपन्यांनी दिली आहे. राज्यसरकार तसेच तेल कंपन्यांतर्फे वेळोवेळी पेट्रोल पंपांवरील इंधन साठ्याचा आढावा घेण्यात येत असून इंधनाची अखंडित उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी या साठ्यात वेळोवेळी भर घालण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यांतील किरकोळ दुकानांमध्ये डिझेल आणि पेट्रोलच्या मागणीत अलीकडे तीव्र वाढ झाली आहे असे निरीक्षण सार्वजनिक क्षेत्रातील तिन्ही तेल विपणन कंपन्यांनी नोंदवले आहे. असे असले तरीही, ही वाढीव मागणी सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी पूर्णपणे भागवली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांची सर्व किरकोळ इंधन विक्री दुकाने कोणत्याही अडथळ्याविना कार्यक्षमतेने सुरु असून दुर्गम भागातील किरकोळ विक्री केंद्रांमध्ये मागणी आणि पुरवठा यांच्यातील असामान्य तफावतीमुळे इंधनाचा अंशत: तुटवडा दिसून आला.

मे २०२६ च्या पहिल्या तीन आठवड्यांमध्ये (१ मे २०२६ ते २१ मे २०२६) गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील इंधनाच्या मागणीच्या तुलनेत इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ दिसून आली असून, पेट्रोलची मागणी १८.५४मनी तर डिझेलची मागणी २२.३मनी वाढली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तीन प्रमुख तेल विपणन कंपन्यांनी महाराष्ट्रभरात एकूण ४०२ हजार किलोलिटर्स (टीकेएल) पेट्रोल आणि ७८९ हजार किलोलिटर्स (टीकेएल) डिझेलचा पुरवठा केला आहे. अनेक जिल्ह्यात सुरू असलेल्या कृषी हंगामी कामांमुळे सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांच्या पेट्रोलियम उत्पादनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून आले आहे. याशिवाय खाजगी कंपन्यांच्या इंधन दरांपेक्षा सार्वजनिक क्षेत्रातील पेट्रोल पंपावरील दर, पेट्रोलबाबत प्रति लिटर सुमारे ५ रुपये आणि डिझेलबाबत प्रति लिटर ३ रुपयांनी कमी असल्याचे दिसून आले आहे. कमी किमतींमुळे खासगी कंपन्यांचे किरकोळ ग्राहक सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या किरकोळ विक्री केंद्रांकडे वळल्याने मागणीवर अतिरिक्त दबाव निर्माण झाला आहे. तसेच, संस्थात्मक आणि औद्योगिक ग्राहकांनीही प्रति लिटर सुमारे ३० रुपये दरातील फरकामुळे किरकोळ इंधन विक्री केंद्रांकडे वळण्यास सुरुवात केली आहे. येत्या काही दिवसांत पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत आणखी वाढ होण्याच्या भीतीने ग्राहकांकडून घाबरून साठेबाजी आणि काळाबाजारही होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील तिन्ही तेल विपणन कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवर डिझेल आणि पेट्रोलच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. पेट्रोल आणि डिझेलची ही वाढीव मागणी तिन्ही सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी पूर्णपणे भागवली आहे.

एलपीजीृ- महाराष्ट्रात सध्या सार्वजनिक क्षेत्रातील तिन्ही तेल विपणन कंपन्यांकडे मिळून सुमारे २८,८८४ मेट्रिक टन एलपीजीचा साठा उपलब्ध आहे. वितरकांकडील साठादेखील नियमितपणे भरून काढला जात असून पुरवठा सुरळीत ठेवला जात आहे.

**घरगुती एलपीजी**

घरगुती एलपीजी सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून, ग्राहकांच्या बुकिंगनुसार वितरण सुरू आहे. तेल कंपन्यांनी आश्वासन दिले आहे की, एलपीजी रिफिल थेट ग्राहकांच्या घरी पोहोचवले जातील.

ग्राहकांना रिफिल बुकिंगसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म वापरण्याचा आणि एलपीजी दुकानांना अनावश्यक भेट देणे टाळण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

बिगर-घरगुतीव्यावसायिक एलपीजी सध्या, युद्धपूर्व परिस्थितीच्या तुलनेत, व्यावसायिक एलपीजी पुरवठ्यापैकी जवळपास ६०म गरज पूर्ण केली जात आहे. तसेच रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी आणि सामाजिक सेवा संस्था यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांना १००म पुरवठा सुनिश्चित केला जात आहे. याव्यतिरिक्त, शासकीय निर्देशांनुसार स्थलांतरित मजुरांसाठी ५ किलो फ्री ट्रेड एलपीजी (एफटीएल) रिफिलचे वितरण केले जात असून, मे २०२६ दरम्यान दररोज सरासरी सुमारे २०,५८६ सिलिंडर वितरित केले जात आहेत.

**पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी )**

सध्याच्या पुरवठा आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून आणि पाईपद्वारे नैसर्गिक वायूच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याची तातडीची गरज लक्षात घेऊन, महाराष्ट्र शासनाने २७ मार्च २०२६ रोजी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग आणि इतर संबंधित प्राधिकरणांच्या सीजीडी पाईपलाईन टाकण्यासंबंधीच्या प्रलंबित अर्जांना मानीव परवानगी दिली आहे. महाराष्ट्रात सध्या सुमारे ४४ लाख पीएनजी जोडण्या असून देशात सर्वाधिक पीएनजी ग्राहक असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र अग्रस्थानी आहे.

महाराष्ट्रात पीएनजी जाळ्याचा विस्तार वेगाने करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यभर सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन (सीजीडी) जाळ्याच्या जलद विस्ताराला गती दिली आहे. १ एप्रिल २०२६ पासून महाराष्ट्रात एकूण १,०३,०९४ नवीन पीएनजी गॅस जोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या असून, हा आकडा देशातील सर्वाधिक आकडेवारी असणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. मे २०२६ पासून राज्यस्तरीय समन्वयक (तेल उद्योग), महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली दर आठवड्याला पीएनजी कृती दलाच्या आढावा बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकींमध्ये एलपीजी तेल विपणन कंपन्या आणि सीजीडी कंपन्यांचा सहभाग असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा घेऊन जाळ्याच्या विस्ताराला गती देण्यात येत आहे.

**रॉकेलचे वितरण**

केंद्र सरकारकडून तरतूद करण्यात येणाऱ्या सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत (पीडीएस) रॉकेलचे वितरण महाराष्ट्रात सुरू झाले आहे. गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नाशिक, वर्धा, अकोला, बुलढाणा, नागपूर, पालघर, ठाणे, धाराशिव, सोलापूर, लातूर, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये एकूण ५७२ किलोलीटर रॉकेलचे वितरण करण्यात आले आहे. पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी राज्य शासनाने अनेक सक्रिय उपाययोजना केल्या आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हास्तरावर दक्षता आणि मोबाईल पथके स्थापन करून तपासणी आणि धाडी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. घरगुती गॅसचा बेकायदेशीर वापर, साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कठोर कारवाई केली जात आहे. राज्य शासनाची पथके दररोज छापे घालत असून, अनधिकृत पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी सिलिंडर जप्त केले जात आहेत. आवश्यकतेनुसार एफआयआरही दाखल करण्यात येत आहेत. महाराष्ट्रभर पेट्रोलियम पदार्थांचा सुरळीत आणि अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी तेल विपणन कंपन्या (बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल), गॅस वितरक आणि सीजीडी कंपन्यांसोबत नियमित आढावा बैठका घेतल्या जात आहेत.

वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील नागरिकांना पेट्रोलियम पदार्थांची घाबरून खरेदी किंवा साठेबाजी न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन आणि सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या राज्यभर पेट्रोलियम पदार्थांचा योग्य आणि सुरळीत पुरवठा सुनिश्चित करत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्काराने महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेचा पुण्यात सन्मान

## शानदार पुरस्कार सोहळ्याला सोलापूरकरांची मोठी हजेरी; सोलापूरची अश्विनी चव्हाण यांना उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आद्य साहित्य संस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने जाहिर करण्यात आलेल्या राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून सोलापूरच्या महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण शाखेला गौरवण्यात आले. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात मंगळवार दि. २६ मे रोजी झालेल्या या शानदार सोहळ्यात ज्येष्ठ सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते तर ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक ऋषिकेश जोशी, संगीतकार पं.सत्यशील देशपांडे, मसाप पुणे चे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मसाप दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,



कोषाध्यक्ष अमोल धाबळे यांनी पुरस्कार स्विकारला. यावेळी अविनाश महागांवकर, नगरसेवक सात्विक बडवे, सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, श्रुती वडकबाळकर, ॲड. जे.जे. कुलकर्णी यांच्यासह राज्यभरातील साहित्यिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

गेल्या १२० वर्षापासून मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धन करत अनेक अनेक थोर लेखक, साहित्यिक यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे ही संस्था संपूर्ण देशात नावारुपाला आणली. संपूर्ण राज्यात तसेच देशात आणि परदेशातही महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखांचा विस्तार झालेला आहे. त्यातच सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक शाखा आहेत. या सर्व शाखांमधून अनेक चांगले उपक्रमाचे आयोजन करण्यात येवून मराठी साहित्य आणि संस्कृतीचे जतन केले जात आहे. परिषदेच्या १२१ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने दरवर्षी अनेक पुरस्काराचे वितरण होते त्याच अनुषंगाने यंदाच्या वर्षीचा राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे वैशिष्ट्यपूर्ण शाखेचा पुरस्कार सोलापूरच्या दक्षिण शाखेला जाहिर करण्यात आला.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरकडून कार्यक्रमाचे नेटके नियोजन, शिस्तबध्दता, तेच तेच पणा न आणता विविधता आणून प्रत्येकवेळी नवनवीन संकल्पना राबवणे, जास्तीत जास्त आणि नवनवे प्रेक्षकांपर्यत कार्यक्रम पाहोचवणे, पारंपारिक पध्दती सोबतच आधुनिकतेचा समावेश करणे, कार्यक्रमाचे आयोजन करताना वेळेचे योग्य नियोजन आणि दिलेल्या वेळेतच कार्यक्रम सुरू करून समारोप करण्याची परंपरा, वर्षभरात राबवलेल्या कार्यक्रमाचे अवलोकन करून वेळोवेळी त्याचा हिशोब, ऑडीट आणि अहवाल तयार करून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्याकडे वेळेत पाठवणे, या सर्व महत्वाच्या गोष्टीचा विचार करून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवड समितीने दक्षिण सोलापूर शाखेला वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कारासाठी निवड केली. नेहमी विविध वैशिष्ठपूर्ण उपक्रम राबवण्यासाठी शाखेचे अध्यक्ष रेणुका महागांवकर यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष प्रा,दीपक देशपांडे, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर, कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर यांच्यासह दक्षिण शाखेचे सर्व पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. दि. २६ मे रोजी बालगंधर्व रंग मंदिरात वार्षिक ग्रंथ व विशेष ग्रंथकार पुरस्कार प्रदान सोहळा, मसाप जीवन गौरव व डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करून पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील विविध साहित्यिक आणि संस्थांचा गौरव यावेळी करण्यात आला.

सोलापूरच्या अश्विनी चव्हाण यांचा उत्कृष्ठ कार्यकर्ता म्हणून पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. रोख रक्कम आणि स्मृती चिन्ह असे सर्व पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्कार सोहळ्यासाठी सोलापूरमधून अनेकजणांनी हजेरी लावलेली होती.

यावेळी अंजली कुलकर्णी, डॉ. आशुतोष जावडेकर, प्रमुख कार्यवाह सुनील महाजन सुनेत्रा मंकणी प्रसाद मिरासदार, प्रा. माधव राजगुरू डॉ. नीतीन संगमनेरकर,विभागिय कार्यवाह डॉ. संजीव गिरासे, जयंत येलूलकर यांच्यासह पदाधिकारी कार्यकारी मंडळ व मसाप पुणे परिवार मोठ्यासंख्येने उपस्थित होता.

# उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केली मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या तब्येतीची विचारपूस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : काही दिवसांपूर्वी पुणे-मुंबई महामार्गावर मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. मात्र, पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी भाविकांनी वेळेवर मदत करून त्यांना तातडीने पुणे येथील रुग्णालयात दाखल केल्याने योग्य उपचार मिळाले आणि मोठा अनर्थ टळला. या प्रसंगातून आपण साक्षात पांडुरंगाच्या कृपेने वाचलो, अशी भावनिक प्रतिक्रिया दिलीप धोत्रे यांनी व्यक्त केली होती.

दरम्यान राजकीय,सामाजिक याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी दूरध्वनी तसेच प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या तेभेटीची विचारपूस केली होती.

पुणे येथील उपचारानंतर सध्या दिलीप धोत्रे हे पंढरपूर येथील निवासस्थानी विश्रांती घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.

यावेळी माजी खासदार राहुल शेवाळे, खासदार धैर्यशील माने, माजी आमदार शहाजी बापू पाटील तसेच माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे हे देखील उपस्थित होते.

यावेळी उदय सामंत यांनी दिलीप धोत्रे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती घेतली. तसेच त्यांना धीर देत काळजी घेण्याचा सल्ला दिला. बराच वेळ हितगुज करत त्यांनी धोत्रे यांना मानसिक बळ देण्याचाही प्रयत्न केला.

विशेष म्हणजे, अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी मुंबई येथील हॉटेल ताज येथे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दिलीप धोत्रे यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता. उद्योग क्षेत्रात अल्पावधीत यश मिळवत अनेक बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला होता. त्या कार्यक्रमावेळी धोत्रे आणि सामंत यांच्यात विविध विषयांवर जवळपास तासभर चर्चा झाली होती.

दरम्यान, पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर धोत्रे यांच्या अपघाताची माहिती मिळताच मंत्री उदय सामंत यांनी धोत्रे यांची आठवण ठेवत पंढरपूर येथील त्यांच्या निवासस्थानी भेट दिल्याने धोत्रे यांनी समाधान व्यक्त केले. या कठीण काळात आपुलकीने विचारपूस करणारी माणसं मिळणं हेच खरं बळ असतं, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

# स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारा : मंत्री आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचे कठोर धोरण आहे. या कायद्याच्या व्यापक प्रसार, प्रचार व अंमलबजावणीत राज्य तपासणी व संनियंत्रण समितीच्या सदस्यांनी आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करून समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारली जावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आरोग्य भवन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य तपासणी व संनियंत्रण समितीची बैठक झाली. बैठकीस आमदार स्नेहा दुबे, प्रधान सचिव निपुण विनायक, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक (विलटो) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक डॉ. वैशाली बडधे व समितीचे सदस्य उपस्थित होते. मंत्री आबिटकर म्हणाले, पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व संबधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय निर्माण करून त्याचा उपयोग मूळ उद्देश साध्य करण्यासाठी करावा, यासाठी स्वतंत्र 'डेडिकेटेड टीम' आणि 'डेडिकेटेड यंत्रणा' नियुक्त करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# पंढरपुरात लवकरच जीएसटी कार्यालय होणार ११ हजार करदात्यांना मिळणार लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात जीएसटी कार्यालय सुरू व्हावी अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी केली होती विधानसभेत केली होती पंढरपुरात लवकरच जीएसटी कार्यालय सुरू करण्यात हालचाली सुरू झाले आहे त्यामुळे याचा फायदा अकरा हजार करदात्यांना होणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील करदात्यांना कर भरण्यासाठी नोटीस आली तर अडचणी म्हणणे मांडण्यासाठी सोलापूर येथे जावे लागते त्यामुळे त्यांचा वेळ व पैसा वाया जात आहे त्यामुळे सोलापूर येथे असलेल्या जीएसटी कार्यालयामध्ये उपविभागीय कार्यालय पंढरपूर येथे सुरू करण्यात यावे तसेच या कार्यालयास पंढरपूर मंगळवेढा करमाळा माळशिरस व सांगोला या पाच तालुक्याचा समावेश करावा अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली होती याची दखल शासनाने घेतली असून लवकरच पंढरपुरात जीएसटी चे कार्यालय सुरू होणार आहे त्यामुळे ११००० करदात्यांना त्याचा लाभ ही होणार आहे.

# नवरंगे बालकाश्रमातील मुलांना 'गुड टच-बॅड टच'चे धडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : किशोरवयीन मुला-मुलींना लहानपणापासूनच 'गुड टच' आणि 'बॅड टच' विषयी जागरूक करणे अत्यंत गरजेचे आहे. मुला मुलींनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता सतर्क राहिले पाहिजे. तसेच पालकांनीही आपल्या मुलांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुला-मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण न करता त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवला, तरच मुले आपल्या सोबत घडणाऱ्या चुकीच्या वर्तनाविषयी पालकांशी मोकळेपणाने बोलू शकतील. मुला-मुलींसाठी सर्वंकष लैंगिकता शिक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच पालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठीही हे शिक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन नवरंगे बालकाश्रमाच्या अधीक्षिका ड. राजश्री गाडे यांनी केले.

प्रिसिजन फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर येथील नवरंगे बालकाश्रमात आयोजित सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण कार्यक्रमात त्या




बोलत होत्या. या कार्यक्रमात बालकाश्रमातील ४५ मुला-मुलींनी सहभाग घेतला.

दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरात वीरेंद्र परदेशी यांनी वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल याविषयी मार्गदर्शन केले. सत्यभामा कांबळे यांनी एचआयव्ही-एड्स, सकस आहार याबाबत माहिती दिली. विकी शिवशरण यांनी कॅन्सर, पोक्सो कायदा आणि लैंगिक अत्याचार या विषयांवर मार्गदर्शन केले, तर प्रीती चौधरी यांनी सायबर गुन्हे तसेच योग्य व अयोग्य स्पर्श याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान गटचर्चा, भूमिकानाट्य आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मला माझ्या शरीराविषयी महत्त्वाची माहिती मिळाली आणि संकटाच्या वेळी कोणाशी संपर्क साधायचा हे समजले, अशी प्रतिक्रिया विद्यार्थिनींनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मुला-मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. यावेळी नवरंगे बालकाश्रमाच्या सुपरवायझर सुनीत्रा पवार उपस्थित होत्या.

सोलापूर जिल्ह्यातील बालकाश्रमांतील मुला-मुलींना सर्वंकष लैंगिकता शिक्षणाद्वारे सजग करण्याचा संकल्प प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केला असून, त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मॅनेजर (पब्लिक रिलेशन विभाग) नितीन फलटणकर तसेच असिस्टंट पब्लिक रिलेशन ऑफिसर वैशाली बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**पुणे विभाग शिक्षक मतदार संघामध्ये पाच जिल्ह्याचा समावेश**

# पुणे विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी दत्तात्रय सावंत, बी. पी. रोंगे सर व मंगेश चिवटे इच्छुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







पंढरपूर/प्रतिनिधी : डिसेंबर महिना अखेर पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाची मतदारसंघाची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यातील व पंढरपूर तालुक्यातील दोन भूमिपुत्र दत्तात्री सावंत, बी .पी .रोंगे (सर) व करमाळा तालुक्याचे महाराष्ट्र राज्याची उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आरोग्य विभागाचे प्रमुख मंगेश चिवटे हेही इच्छुक आहेत. यांनीही तयारी सुरू केली आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदार संघामध्ये पाच जिल्ह्याचा समावेश असून ५८ तालुके आहेत त्यामुळे या निवडणुकीमध्ये मते मिळावी यासाठी इच्छुक उमेदवारांनी श्री दत्तात्रय सावंत, बी .पी. रोंगे सर, मंगेश चिवटे, यांनी तयारी सुरू केल्याची दिसून येत आहे.

पुणे विभागीय शिक्षण मतदारसंघात पुणे, सोलापूर कोल्हापूर, सांगली, सातारा या पाच जिल्ह्याचा समावेश आहे. मागील निवडणुकीत बहात्तर हजाराची मतदारांची संख्या होती. यंदाच्या निवडणुकीमध्ये काही मतदारांची वाढ झाल्याची दिसून येत आहे.

निवडणुकी मोर्चे बांधणी दत्तात्रय सावंत, बी.पी .रोंगे, मंगेश चिवटे, यांनी सुरू केली आहे.

सध्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये कारण धुमाळी सुरू आहे. या निवडणुकीमध्ये इच्छुकांची संख्या अनेक आहे. यामुळे कोणाला उमेदवारी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे भाजपने शिवसेना नेते एकनाथ शिंदे सारखी यांनी लाडक्या बहिणीची ही नावे पुढे केली आहे . त्यामुळे. कायम भाजपने सस्पेन्स कायम ठेवला असल्याचे पहावयास मिळत आहे. ही निवडणूक संपल्यानंतर डिसेंबर अखेरपर्यंत पुणे शिक्षक मतदार संघाची निवडणूक होणार आहे. याही निवडणुकीमध्ये भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळते याकडे उत्सुकता शिगेला पोचली आहे. त्यामुळे दत्तात्रय सावंत, बी .पी .रोंगे सर, म्हणजेच चिवटे, यांनी तयारी सुरू केली आहे.

# जिल्ह्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्था व बागायतदारांना जलप्रशुल्क प्रस्तावावर हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : जिल्ह्यातील मोठे प्रकल्प (दुधगंगा, वारणा, राधानगरी व तुळशी), मध्यम प्रकल्प (कडवी, कासारी, कुंभी व धामणी) व लघु प्रकल्पांतर्गत नद्यांवर शासनाने बांधलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांवरून, तसेच सांगली जिल्ह्यातील वारणा नदीतून पाणी घेऊन पिके करणाऱ्या सर्व सहकारी पाणीपुरवठा संस्था व वैयक्तिक बागायतदारांना या जाहीर आवाहनाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने १ जुलै २०२६ ते ३० जून २०२९ या नियंत्रण कालावधीसाठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाची कार्यवाही सुरू केली आहे.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची बैठक संपन्न

## पनवेल अधिवेशनास बहुसंख्येने उपस्थित राहावे - आमदार प्रवीण स्वामी यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : दि. २७ मे २०२६ रोजी तालुका उमरगा, जिल्हा धाराशिव येथील शांताई मंगल कार्यालय येथे 'राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य' संघटनेची विविध पदाधिकारी निवड व आढावा बैठक अत्यंत उत्साहात संपन्न झाली. या प्रसंगी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रदेशाध्यक्ष मा. अनिल नाचपल्ले, राज्य उपाध्यक्ष मा. सुखदेव भालेकर, राज्य सरचिटणीस मा. संतोष भोजने आणि महिला प्रदेशाध्यक्षा श्रीमती रेखा सुडे या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



या बैठकीमध्ये ओबीसी व बहुजन शिक्षकांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करण्यासाठी, तसेच वेतन व भत्ते यांसारख्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी एकत्र आणि एकजुटीने कार्य केले पाहिजे, यावर सखोल चर्चा करण्यात आली. यासोबतच आगामी ५ जून २०२६ रोजी पनवेल (जि. रायगड) येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळ्याच्या नियोजनाबाबतही महत्त्वपूर्ण आढावा घेण्यात आला. या बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणासाठी विविध नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार मा. प्रवीण स्वामी आणि मा. डॉ. आर. डी. शेंडगे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आमदार मा. प्रवीण स्वामी म्हणाले, मी स्वतः एक शिक्षक होतो आणि ग्रामीण भागात शिक्षक संघटना बांधणीसाठी १५ वर्षे काम केले आहे. शिक्षकांचे दुःख, संघटना बांधताना येणाऱ्या अडचणी आणि शासन स्तरावर फक्त मिळणारी आश्वासने याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच सर्व शिक्षक संघटनांनी एकत्र येणे गरजेचे आहे. मी तुमचा आवाज आणि तुमच्या मागण्या यापूर्वीही विधानसभेत मांडल्या आहेत आणि यापुढेही नक्कीच मांडत राहीन, अशी ग्वाही त्यांनी दिली.यानंतर जिल्हा कार्यकारणी निवड जिल्हा परिषद उपाध्यक्ष संजय खंडाळकर, जिल्हा चिटणीस विक्रम पाचंगे, जिल्हा सहसचिव सुधाकर आतकरे, जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर साखरे यांची निवड करण्यात आली असून महिला तालुका कार्यकारणी तालुका अध्यक्ष श्रीम. अरूणा वाघे,सचिव श्रीम.सुनिता पोतदार,उपाध्यक्ष श्रीम. अनिता माने, कार्याध्यक्ष सुवर्णा जगताप, कोषाध्यक्ष श्रीम. शशिकला राठोड,सहसचिव पुष्पलता पांढरे, संघटक धनश्री दळवी, वर्षाराणी पाटील, ऊर्मिला मुसळे, प्रीती काळे, सुनिता पटवारी, भाग्यश्री पंडीत यानंतर जिल्हा परिषद शिक्षक तालुका कार्यकारणी तालुका सल्लागार व्यंकट क्षिरसागर, विजयकुमार घोडके,तालुका अध्यक्ष गोविंद कुंभार,सचिव शाहुराज हुलगे,उपाध्यक्ष माधव धुळे,कोषाध्यक्ष महादेव आहेरकर, कार्याध्यक्ष विनायक चव्हाण,सहसचिव अनंत लोखंडे, संघटक राम जमादार, रमेश दुधभाते, दत्ता पाटील वैभव पटवारी यांची निवड करण्यात आली.यानंतर खाजगी अनुदानित व स्वयं अर्थसहायित शिक्षक तालुका कार्यकारणी निवड करण्यात येऊन तालुका सल्लागार प्रा. परमेश्वर सुर्यवंशी तालुकाध्यक्ष मनोजकुमार गुरव, उपाध्यक्ष किशोर पांचाळ, सचिव प्रा. मारूती खमितकर, कार्याध्यक्ष महेश खंडाळकर, कोषाध्यक्ष दयानंद साखरे,सहसचिव विजय सगर, संघटक इरप्पा पोतदार, संघटक राजेंद्र पटवारी, लक्ष्मण देवकर, विजयकुमार घोडके, प्रदीपकुमार सगर आदी पदाधिकारी निवड करून मान्यवरांच्या हस्ते निवड पत्र देण्यात आले.

या बैठकीसाठी लातूर येथील गोविंद सगर, कांचन स्वामी, हिंगोली येथून लहू राक्षे, अरुणा गुणाले यांच्यासह धाराशिव व इतर जिल्ह्यांतील अनेक शिक्षक व शिक्षिका भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी देविदास बनसोडे यांनी केले.सूत्रसंचलन प्रा. परमेश्वर सूर्यवंशी सर आणि सूत्रसंचालन प्रा. विजय सगर यांनी प्रभावीपणे केले.मान्यवर आणि उपस्थितांचे आभार धाराशिवचे जिल्हाध्यक्ष श्री. अनंत फुलसुंदर यांनी मानले. अत्यंत उत्साही वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रकल्याणकारी 'पसायदानाने' करण्यात आली.

## हरियाणात ४ आणि ५ जून रोजी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कलावैभवाचा अविष्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राची समृद्ध लोकपरंपरा, वैविध्यपूर्ण लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलावैभव राष्ट्रीयस्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने 'लोकायन लोकोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे हरियाणातील गुरुग्राम येथे ४ व ५ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रशासनाच्यासांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आणि 'लोकायन सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, मुंबई' यांच्या सहयोगाने हा दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळा पार पडणार आहे. गुरुग्राम येथील एसजीटी युनिव्हर्सिटीत ४ व ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. या लोकोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध पारंपरिक; तसेच प्रयोगात्म लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. राज्याच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोककला जतन व संवर्धनाचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील नामांकित लोककलावंत यात सहभागी होऊन पारंपरिक लोकनृत्य, लोकसंगीत, पोवाडे, भारूड, गोंधळ, लावणी, दिंडी, लोकनाट्य, आदिवासी लोककला; तसेच आधुनिक प्रयोगशील लोककलांचे सादरीकरण करणार आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीतील जीवनमूल्ये, परंपरा, लोकसंवेदना आणि सामाजिक आशय या कलाविष्कारांतून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहेत. 'लोकायन लोकोत्सव' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा एक वैचारिक आणि कलात्मक उपक्रम ठरणार आहे. विविध कलाप्रकारांमधून भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सामाजिक समरसता आणि लोककलांचे जतन या मूल्यांचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री आशिष शेलार, यांच्या संकल्पनेतून; तसेच सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील लोककला राष्ट्रीयस्तरावर सादर करून कलावंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नव्या पिढीला लोकपरंपरांशी जोडणे आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट करणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. गुरुग्राम येथील रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अनोखा अनुभव या निमित्ताने घेता येणार आहे.या सांस्कृतिक महोत्सवाला रसिकांनी उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोककला आणि लोकसंस्कृतीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखली तालुक्यात वन विभाग 'ॲक्शन मोड'वर !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणावरून आता वन विभाग पूर्णपणे 'क्शन मोड'वर आला आहे.अवैध वृक्षतोड प्रकरणातील संशयित आणि वृक्षतोड बहादरांचे धाबे दणाणले असून, वन विभागाने धडक कारवाई करत मेरा बुद्रुक परिसरातून तब्बल दोन लाख रुपये किमतीचा बेकायदेशीर लाकडाचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे लाकूड तस्करांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.




दिनांक २८मे २०२६ रोजी गोपनीय माहितीच्या अनुषंगाने मेरा बुद्रुक शिवारात अवैधरित्या निम व इतर अडजात प्रजातीचे लाकूड साठा असल्याची माहिती वन विभागाला मिळाली त्यावरून उप वनसंरक्षण बुलढाणा वन विभाग बुलढाणा श्री.जमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण दोन लाख किमतीचा मुद्देमाल साठवून ठेवलेला निम व इतर प्रजातीच्या लाकडाचा साठा वनविभागाने केला जप्त. सदर कार्यवाही मध्ये अंचरवाडी बीटचे वनरक्षक गजानन माणिकराव पोटे यांनी जागेवर जाऊन सदर लाकडे जप्त केली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, वन विभागाच्या पथकाने मेरा बुद्रुक परिसरात अचानक छापा टाकला. या छाप्यात कोणत्याही वैध परवान्याशिवाय साठवून ठेवलेले मौल्यवान लाकूड आढळून आले. वन अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवत साधारण २ लाख रुपये बाजारमूल्य असलेला हा संपूर्ण लाकूड साठा जप्त केला असून, तो वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मेरा बुद्रुक परिसरात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत वन विभागाने तपासाची चक्रे गतिमान केली होती. मेरा बुद्रुक येथील ही कारवाई त्याच तपासाचा एक भाग असल्याचे बोलले जात असून,या कारवाईमुळे मुख्य सूत्रधारांचे धाबे दणाणले आहेत.सदर कारवाई ही वनरक्षक गजानन माणिकराव पोटे अंचरवाडी बिट वन सेवक ऋषिकेश तुपकर यांनी पार पाडली सदर कारवाई मध्ये मार्गदर्शन माननीय सहाय्यक व संरक्षक प्रादेशिक

### मेरा बुद्रुक परिसरातून २ लाखांचा लाकूड साठा जप्त

व कँम्प्रा बुलढाणा,श्री वैभव काकडे,श्री. वनपरिक्षेत्र अधिकारी बुलढाणा सुनील वाकोडे साहेब सदर प्रकरणाचा तपास वनपाल श्री.प्रदीप प्रकाश मुंढे हे करत आहे.वन विभागाच्या या 'क्शन मोड'चे सुजाण नागरिकांकडून स्वागत होत आहे.

**पर्यावरणाचा ऱ्हास करणारी आणि विनापरवाना वृक्षतोड करणारी कोणतीही टोळी असो, त्यांची गय केली जाणार नाही. चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक परिसरातली कारवाई ही केवळ सुरुवात असून,अवैध वृक्षतोड प्रकरणातील मुख्य आरोपींपर्यंत वन विभाग लवकरच पोहोचेल.**

**- श्री.जमीर शेख वन विभाग अधिकारी**

## दर्जेदार शिक्षणासोबतच दर्जेदार निवासावर शासनाचा भर : मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी वसतिगृहामध्ये आधुनिक आणि सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. याच ध्येयाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त वसतिगृह उभारण्यावर शासनाचा मुख्य भर आहे, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

वांद्रे पूर्व येथील कलानगर परिसरात सुरू असलेल्या 'सर जे. जे. कला संस्था वसतिगृहाच्या' नव्या इमारतीच्या बांधकामाची मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पाहणी केली, आणि कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणीदरम्यान त्यांनी बांधकामाची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली व काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

नव्या वसतिगृहाची वैशिष्ट्ये आणि आधुनिक सुविधा : विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि आरामदायी निवास लक्षात घेऊन या वसतिगृहाचे अत्यंत नेटके नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये प्रामुख्याने खालील सुविधांचा समावेश आहे:

प्रवेश क्षमता : या आधुनिक वसतिगृहामध्ये एकूण १००० विद्यार्थ्यांची (५०० विद्यार्थी आणि ५०० विद्यार्थिनी) निवास क्षमता असेल.

खोल्यांची रचना : वसतिगृहात एकूण ३६४ स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये मुलांसाठी १८२ आणि मुलींसाठी १८२ खोल्या राखीव आहेत.

खोलीतील सुविधा : प्रत्येक खोलीत तीन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कॉट आणि कपाटाची सुविधा दिली आहे. तसेच प्रत्येक खोलीला स्वतंत्र प्रसाधनगृह (अटॅच बाथरूम) जोडण्यात आले असून त्यात गिझरद्वारे गरम पाण्याची सोय असेल.

इतर सोयी : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वसतिगृह परिसरात सुसज्ज वाचन कक्ष, व्यायामाळा, इनडोअर प्ले एरिया, डबल हाईट कॉमन रूम, वार्डन रूम आणि प्रत्येक मजल्यावर शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टरची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि राहण्यासाठी उत्तम वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. हे वसतिगृह मुंबईत शिकणाऱ्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी एक आधुनिक आणि सुरक्षित हक्काचे घर ठरेल,असेही मंत्री चंद्रकांत दादा म्हणाले. या पाहणी दौऱ्याप्रसंगी तंत्र शिक्षण सहसचिव संतोष खोरगडे, अवर सचिव प्रवीण मुंढे, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उपकला संचालक विनोद दांडगे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी आणि संबंधित उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

### रमाई स्मृतिदिनानिमित्त वैचारिक प्रबोधनात्मक अभिवादन सभा संपन्न

### आयुक्त प्रतिभा इंगळे यांचे प्रतिपादन

# स्त्री आणि पुरुष हे दोन्ही पंख सक्षम असले तर गरुडाप्रमाणे भरारी घेता येईल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने रमाई स्मृतिदिनानिमित्त स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक, प्रासंगिक विधानावर डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे २७ मे २०२६ ला अभिवादन सभा संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, रमाईला अभिवादन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी रमाईच्या त्याग व समर्पणाची जाणीव ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. मानवी अहंकारामुळे बहुतांश कुटुंबासह समाजाचा मोठ्या प्रमाणात -हास होत चालला आहे. या अहंकाराची शस्त्रक्रिया करण्याची कोणतीही प्रक्रिया सध्या तरी अस्तित्वात नसल्याने समाजाला अधोगतीपासून वाचवायचे असेल तर प्रत्येकाने अहंकार सोडावा लागेल. आई अति प्रेमापोटी आपल्या अपत्त्यांच्या चुकावर पांघरून घालत असल्यामुळे सुसंस्काराअभावी वर्तमानात कलेक्टर, कमिशनरची अपत्य क्लर्क सुद्धा होणे दुर्मिळ होत चालले आहे. अशावेळी विकासाच्या वल्गना करणारा समाज विनाशाकडे वाटचाल करीत आहे, की काय? अशी उर्वरित समाजाची सद्यस्थिती बघून शंका येत आहे. करिता प्रत्येक कुटुंबाने आपल्या कौटुंबिक समस्या निर्मूलनासाठी फॅमिली संसद अमलात आणून चर्चा केली पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीची अंमलबजावणी करून शासनकर्ती जमात होण्याच्या अनुषंगाने मार्गक्रमण करता येईल. ज्यामुळे संवैधानिक मार्गाने भारताचे संविधान अंमलात आणून सुदृढ मानवतावादी समाज निर्माण करता येईल. या सर्व प्रक्रियेत लैंगिक भेदभाव न पाळता महिलांना सहभागी करून घेऊ शकलो, तर मग रमाईला आदरांजली अर्पण केल्यासारखे होईल. याचे मर्म समाजाला कळावे, म्हणून सदरील विधानावर जाणीवपूर्वक अभिवादन सभेचे आयोजन केलेले आहे.

राज्य अल्पसंख्यांक विभागातील आयुक्त मा. प्रतिभा इंगळे प्रशासकीय कामात व्यस्त असल्यामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत. मात्र तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्हिडिओग्राफी द्वारे उद्घाटनपर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु तथागत बुद्ध व महात्मा फुले यांच्या समताधिष्ठित मूल्यांचा प्रभाव असल्यामुळे समाजात लिंग विरहित समता प्राप्त होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो, असे म्हटले असावे. स्त्री आणि पुरुष हे समाजरुपी पक्ष्याचे दोन पंख आहेत, हे दोन्ही पंख सक्षम असले तरच त्यांना गरुड पक्षाप्रमाणे उंच भरारी घेता येईल. ही अपेक्षा साकार करण्यासाठी हिंदू कोड बिल लागू होत नाही म्हणून त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. पुढे त्यांनी महिलांना प्रसूती रजा, सुरक्षितता, समान वेतन, मतदानाचा अधिकार इत्यादींना कायद्यात लिपीबद्ध केले. विवाहानंतर सुरुवातीच्या पंधरा वर्षातील काळात बाबासाहेब सात वर्षे शिक्षणासाठी न्यूयॉर्क लंडन अमेरिका इत्यादी ठिकाणी गेले होते. तरीही बाबासाहेबांच्या दूरदृष्टीची जाणीव असल्याने रमाईने संसाराची जबाबदारी चोखपणे पार पाडली.

प्रमुख वक्ते डॉ. अनिल गायकवाड यांनी पावर पॉइंट द्वारे प्रस्तुतीकरण करताना स्पष्ट केले की, शिक्षण, उद्योजगता व रोजगाराच्या माध्यमातून स्वावलंबनासाठी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आवश्यक आहे. करिता महिला सशक्तीकरणावर कार्य करीत असताना जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना ५०% प्रतिनिधित्व बहाल केले पाहिजे.

याप्रसंगी बोलताना राज गायकवाड म्हणाले की, महिला ही वस्तू नाही तर ती व्यक्ती आहे. सम्यक रामटेके म्हणाले की, मुक्ता साळवे सारखी बहीण, रमाई सारखी पत्नी तर जिजाई सारखी आई असावी. स्वागताध्यक्ष डॉ. कल्पना गंगावणे सर्वांचे स्वागत करताना म्हणाल्या की, अशा विषयावर चर्चा होणे ही काळाची गरज आहे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की शिकेल तो टिकेल याप्रमाणे टिकाव लागेल असे शिक्षण घेतले पाहिजे. वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर मॅडम म्हणाल्या की, शेवटच्या घटकातील माणूस जागृत होईपर्यंत जागृतीचे कार्य सातत्याने चालू राहिले पाहिजे. जमाते इस्लामे हिंद च्या शहराध्यक्ष शाईस्ता कादरी म्हणाल्या की, कोहिनूर हिरा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रदान केलेल्या संवैधानिक अधिकारामुळे मी आपणासमोर उभी आहे. डॉ. प्रगती प्रतीक पंचशील यांनी जाणीव करून दिली की, रमाई तुला झालेल्या आजारावर समाजात औषध असले तरी, माझ्या समाजाला झालेल्या आधारावर औषधच नाही ग! असे बाबासाहेब रमाईला म्हणाले होते.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी ॲड. सुनील कुमार नागवंश ग्रुप प्रस्तुत आदरांजलीपर गीते सादर करण्यात आली. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे तर सूत्रसंचालन उद्योजक शशिकांत काळे व उद्योजक मिलिंद बागुल यांनी आभार व्यक्त केले.